# अवैध गर्भपात, बालविवाह रोखण्याचे मोठे आव्हान

## रूपाली चाकणकर; ६३२ महिला, ३३२ मुली बेपत्ता

**कोल्हापूर, ता. ६ :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बालविवाह होत आहेत. अवैध गर्भपातांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे, बालविवाह रोखण्याच्या आव्हानासह अवैध सोनोग्राफी किंवा गर्भलिंग तपासणी आणि गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी, यासाठी उद्या (ता. ७)पासून छापा सत्र सुरू करण्याच्या सूचना दिल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज येथे सांगितले.

'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराबाई सभागृहात जनसुनावणी झाली. त्यात ९१ तक्रारी आल्या. त्या आढाव्यानंतर त्या म्हणाल्या, "जिल्ह्यात ७४ बालविवाह उघडकीस आले. ५५ बालविवाह रोखले. १९ गुन्हे नोंद आहे. जिल्ह्यात २०२२ पासून आतापर्यंत दोन हजार ४७८ महिला बेपत्ता होत्या. पैकी एक हजार ८४६ सापडल्या, उर्वरित बेपत्ता आहेत. त्याचवेळी बेपत्ता ३३२ मुलींचाही शोध सुरू आहे."

त्या म्हणाल्या, "जिल्ह्यात गर्भलिंग तपासणी,



**कोल्हापूर :** शासन आपल्या दारी या उपक्रमार्गत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात राज्य महिला आयोगाच्या रुपाली चाकणकर यांनी नागरिकांच्या तक्रारी समजून घेतल्या.

अवैध गर्भपाताची प्रकरणे उघडकीस आली. अशी दहा प्रकरणे आहेत. त्यापैकी सहा गुन्ह्यांचा निकाल लागला. सरकारी दवाखान्यातून गर्भपाताचे प्रकार होतात का, याचे धागेदोरे तपासले पाहिजेत. समाजमंदिर किंवा सांस्कृतिक सभागृहात बालविवाह होत आहेत.

पान ८ वर >

Scanned with OKEN Scanner

# 'महिला आयोग दारी'च्या जनसुनावणीत ९१ तक्रारी

## पाच प्रकरणांमध्ये समेट : रूपाली चाकणकरांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत गुरुवारी कोल्हापूर जिल्ह्यात घेण्यात आलेल्या जनसुनावणीत ९१ तक्रारी मिळाल्या. यात पाच कौटुंबिक प्रकरणांमध्ये समेट घडवून समुपदेशन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराराणी सभागृहात झालेल्या सुनावणीच्या वेळी ९१ तक्रारी प्राप्त झाल्या. यात सर्वाधिक केसेस या कौटुंबिक छळ, त्रासाच्या होत्या. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, विधिसेवा प्राधिकरणाचे सचिव प्रीतम पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी शिल्पा पाटील उपस्थित होते. पोलिस, प्रशासन, विधिसेवा, समुपदेशक असलेले तीन पॅनल तयार सर्व केसेसचा निपटारा करण्यात आला. पाच कौटुंबिक केसेसच्या प्रकारांमध्ये समेट घडवून आणून पाचही जोडपी पुन्हा सुखाने नांदावीत यासाठी समुदेशन करत या जोडप्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ९१ प्रकरणांमध्ये वैवाहिक, कौटुंबिक समस्यांसंदर्भात ६४, सामाजिक ५, मालमत्ता आणि आर्थिक विषयाशी संबंधित ६ आणि इतर १६ प्रकरणांचा समावेश होता.




कोल्हापुरात जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी प्रीतम पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

# बेपत्ता महिला, बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना करा

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या सूचना; जनसुनावणीत ९१ प्रकरणांची सुनावणी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

बालविवाह तसेच मुली व महिला बेपत्ता होण्याची बाब चिंताजनक आहे. अशी प्रकरणे रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी गुरुवारी आढावा बैठकीत केल्या. 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ९१ प्रकरणांवर सुनावणी झाली.

बालविवाह आणि महिला बेपत्ता होण्याची प्रकरणे हे राज्यासमोरील गंभीर प्रश्न आहेत. ते सोडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाज मंदिर अथवा धार्मिक स्थळांमध्ये बालविवाह झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी. शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी व पालकांत जनजागृती करा, असे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : जिल्हाधिकारी कार्यालयात महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

मनोधैर्य योजनेंतर्गत पीडित महिलांना आर्थिक मदत मिळवून द्या. घरगुती कामगारांसाठी घरेलू कामगार मंडळामार्फत लाभार्थी महिलांना लाभ मिळवून द्या. औद्योगिक क्षेत्रात महिलांना प्रसूती लाभ तसेच समान काम समान वेतन दिले जात असल्याची खात्री करा, असेही त्यांनी सांगितले.

खोची येथील प्रकरणी पोलिस विभागाने पीडितेला जलद न्याय मिळवून दिल्याबद्दल तत्कालीन पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे व पोलिस विभागाचे चाकणकर यांनी कौतुक केले. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत धाडसत्र वाढवून बोगस डॉक्टरांवर व दोषींवर कडक कारवाई करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. विधवा प्रथा बंदी करणाऱ्या हेरवाड ग्रामपंचायतीचे कौतुक करून राज्यातील अन्य ग्रामपंचायतींनी या उपक्रमाचे अनुकरण करावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषदेच्या डोंगराळ व दुर्गम तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या 'नन्ही कली' उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी बालविवाह व अवैध गर्भलिंग तपासणी रोखण्यासाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी पोलिस विभागाकडे प्राप्त महिला तक्रारी व सद्यस्थितीची माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने मुली व महिला विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, महापालिका उपायुक्त शिल्पा दरेकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शिल्पा पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### महिला कॉन्स्टेबलकडून सासूचा छळ

महिला कॉन्स्टेबलकडून सासूचा होणारा छळ, तिसरीही मुलगी झाली म्हणून नवऱ्याने दिली सोडून, विवाहानंतर पतीचे निधन झाले; पण विवाह नोंद नसल्याने कोणतेच लाभ मिळत नाहीत, अशा तक्रारींवर सुनावणी झाली. याकरिता तीन पॅनेल करण्यात आले होते. यावेळी संबंधितांचे समुपदेशन करण्यात आले. अधिकाऱ्यांनीही तत्काळ आदेश देत या तक्रारीची दखल घेतली. पाच कौटुंबिक केसेसच्या प्रकारांमध्ये समेट घडवून आणला. आजच्या सुनावणीत ६४ प्रकरणे कौटुंबिक, वैवाहिक होती. सामाजिक-५, मालमत्ता तसेच आर्थिक स्वरूपाची ६ तर इतर विषयांशी संबंधित १६ प्रकरणे होती.

Scanned with OKEN Scanner